# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 20/04/2023 (गुरूवार) सकाळ


### जिवानाशी ठार करणाऱ्या आरोपीला अटक

पो.स्टे. बेला :— अंतर्गत ३२ कि.मी अंतरावर मौजा उरकुडापार येथे दिनांक १८/०४/२०२३ चे १८/०० वा. दरम्यान यातील **मृतक नामे— अनिल कवडु कन्नाके, वय ४४ वर्ष, रा. उरकुडापार ता. भिवापुर जि. नागपुर** हा दारू पिवुन येवुन दारूचे नशेत त्यांची आई फिर्यादी नामे— ग. भा. सरस्वती कवडु कन्नाके, वय ७१ वर्षे रा. उरकुडापार ता. भिवापुर जि. नागपुर हीला परत दारू पिण्यासाठी पैसे मागीतले असता हीने पैसे देण्यास नकार दिल्याने मृतक हा फिर्यादीस शिविगाळ करीत असता यातील **आरोपी नामे— कैलास कवडु कन्नाके, वय ४२ वर्षे रा. उरकुडापार ता. भिवापुर जि. नागपुर** हा तेथे आला व मृतकास म्हणाला की, तु कशाला आईला शिवीगाळ करत आहे यावरून दोघा भावांचे झगडा भांडण होवुन भांडणा दरम्यान आरोपी याने रागाच्या भरात घराच्या बाहेर रस्त्यावरील एक सीमेंटचा दगड उचलुन मृतक याच्या चेहरा व डोक्यावर मारून त्याचा खुन केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. बेला येथे आरोपीविरुध्द कलम ३०२ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक केली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि राहुल ठेंगणे मो. क्र. ९८२३३६४१४७ हे करीत आहे.

### चोरी

१) पो.स्टे. कन्हान :— अंतर्गत डुमरी स्टेशन निरज धाब्याजवळ येथे दिनांक १८/०४/२०२३ चे २३:३० वा. ते दि. १९/०४/२०२३ चे ०५:३० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे— विनयकुमार सुब्बाराव मल्लवरपु, वय ४६ वर्ष, रा. डुमरी स्टेशन निरज धाब्याजवळ याचे शेतीचे कामाचे गव्हाचे लोखंडाचे थ्रेसर बास्केट किंमती अंदाजे ३१,०००/— रू घरासमोर ठेवलेले कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा. काटे ब. नं. ६४३ पोस्टे कन्हान मो. नं. ९०११३२६७८३ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. रामटेक** :— अंतर्गत मानापुर ता. रामटेक येथे दिनांक १८/०४/२०२३ चे १५.३० वा. ते १५.४० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे— प्रणव प्रभाकर कावळे, वय ३० वर्ष रा. सहायक अभियंता महावितरण केंद्र नगरधन यास वरीष्ठ तंत्रज्ञ अमोल नोनारकर यांनी फोन करून कळवले की मौजा मानापुर येथील लघुदाब वाहीनीचे तार चोरी गेले आहेत. सदर ठिकाणची पाहणी केली असता शिवारात असलेल्या लघुदाब वाहीनीचे अंदाजे २१६० मीटर किंमती अंदाजे ५१८४०/— रूपयाचा तार व सुमारे ०९ सिमेंटचे पोल पाडुन अंदाजे १८०००/— रू. चे नुकसान केले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम ३७९, ४२७ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक योगेश भुरे ब. नं. ६७३ मो. क्र. ७७२२००३६७३ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**